जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २६४ दिनांक - २१/०६/२०२४**

युनिट-३ गुन्हे शाखा पुणे शहर

# सराईत गुन्हेगाराकडून एक पिस्टल व दोन राऊंड जप्त करुन आरोपीस केले अटक

गुन्हे शाखा, युनिट ३,पुणे कडील सहायक पोलीस फौजदार सुनिल पवार यांना मिळाले बातमी वरून सराईत गुन्हेगार नामे जयेश विजय लोखंडे,वय.२४ वर्षे,रा.२२४, मंगळवार पेठ, पुणे यास दिनांक १८/०६/२०२४ रोजी कै.धोंडिबा गुणाजी बने रोडवरील जवळील फर्ग्यूसन कॉलेजच्या बंद असलेल्या गेट क्रमांक ३ जवळ,शिवाजीनगर पुणे येथे पकडून त्याचेकडून एक देशी बनावटीचे पिस्टल,दोन राऊंड असा एकुण ४१,०००/-रू.किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

नमुद आरोपी हा पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून तो नेहमी घातक शस्त्रे बाळगत असतो.त्याचेविरूध्द मोका,दरोडा,दरोडयाची तयारी,जबरी दुखापत,दुखापत, बेकायदेशीर जमाव जमविणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

नमुद आरोपी हा अलंकार पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ९०/२०२४ आर्म ॲक्ट ३,२५ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)सह १३५ या गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी असून त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. दाखल गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिगंबर चव्हाण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही,मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे पुणे शहर मा.सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १,श्री.सुनिल तांबे पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगराव पवार, पोलीस अंमलदार सुनिल पवार,शरद वाकसे,पांडूरंग कामतकर,केदार आढाव,संजिव कळंबे,ज्ञानेश्वर चित्ते,साईनाथ पाटील,सतीश कत्राळे,राकेश टेकावडे, गणेश शिंदे,सोनम नेवसे यांचे पथकाने केली आहे.